SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
Estd.1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/8813-A दि. 23 ऑगस्ट, 2019

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:- बी.व्होक अभ्यासक्रम व कम्युनिटी कॉलेजला मान्यता देणेबाबत**
**संदर्भ :- मा.कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे संदर्भ क्र. संकीर्ण - २०१९/(३२२/१९)/मशि-४ दि.१५ जुलै, २०१९ रोजीचे पत्र.**

महोदय/महोदया,

सोबत मा.कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे संदर्भ क्र. संकीर्ण - २०१९/(३२२/१९)/मशि-४ दि.१५ जुलै, २०१९ रोजीचे बी.व्होक व कम्युनिटी कॉलेज शासन मान्यते शिवाय सुरू करता येत नसल्याबाबतचे पत्र माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

कळावे

आदेशान्वये

(श्री. व्ही.एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१९/(३२२/१९)/मशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १५ जुलै, २०१९.

प्रति,
प्र. कुलगुरू,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- बी.व्होक अभ्यासक्रम व कम्युनिटी कॉलेजला मान्यता देणेसंदर्भात.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्याचे निर्देश आहेत की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (७)(क) व कलम १०९ (७)(ख) अनुसार कोणतेही व्यवस्थापन, राज्य शासनाच्या पुर्वपरवानगीखेरीज कोणतेही नवीन महाविद्यालय, परिसंस्था तसेच नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करणार नाही अशी तरतूद आहे.

मात्र, बी.व्होक अभ्यासक्रम तसेच कम्युनिटी कॉलेज शासन मान्यतेशिवाय सुरू करण्यात येत असून त्यास विद्यापीठाकडून संलग्निकरण देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. असे संलग्निकरण विद्यापीठाकडून शासन मान्यतेच्या अधीन देण्यात येते व त्यानंतर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. शासन स्तरावर प्रस्तावाची छाननी केली असता प्रस्तावामध्ये बऱ्याच त्रुटी आढळून येत असून त्याची पुर्तता विद्यापीठाकडून केली जात नसल्याने किंबहूना असे प्रस्ताव विद्यापीठांकडून गांभीर्यपूर्वक तपासले गेले नसल्याचे निदर्शनास येत असून अभ्यासक्रम शासन मान्यतेशिवाय सुरू करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासन मान्यतेशिवाय अभ्यासक्रम सुरू करण्याची बाब ही महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (७)(क) व कलम १०९ (७)(ख) मधील तरतूदींचा भंग करणारी आहे. त्यामुळे सर्व अकृषी विद्यापीठांना कळविण्यात येते की, शासन मान्यतेशिवाय बी.व्होक/ कम्युनिटी कॉलेज अभ्यासक्रम तसेच इतर कोणतेही अभ्यासक्रम शासन मान्यतेशिवाय सुरू करण्यात येऊ नयेत. तसेच अशा अभ्याक्रमांना विद्यापीठांकडून संलग्निकरण देण्यात येऊ नये, असे झाल्यास

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 1743
Date 16/8/19

शासन स्तरावर त्याची गंभीर दखल घेण्यात येऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, या सूचना विद्यापीठांनी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

यास्तव विद्यापीठ अधिनियमातील नमूद तरतूद विचारात घेता, शासन मान्यतेशिवाय किंवा मान्यतेच्या अधीन राहून कोणतेही अभ्यासक्रम सुरू करण्यात येऊ नयेत अशा सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना देण्यात येत आहेत.

(द. व. खारके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) निवडनस्ती (मशि-४)

T-2

c:\users\pranita.raut\desktop\मनोज\१५.०५.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त b.voc course.docx